जा.क्र.मसंकें/प्रअवा/८९६/२०२२,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी,
दिनांक 28 OCT 2022

प्रति,

मा.प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

**विषयः— मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागातील काजू व आंबा बागेत मजुरांकडून कामे करून घेण्यासाठी "प्रक्षेत्र सहाय्यक" कंत्राटी पध्दतीने भरणेसाठीची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग येथे काजू व आंबा बागेतील विविध कामे मजुरांकडून करून घेण्यासाठी "प्रक्षेत्र सहाय्यक" हे पद कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरावयाचे आहे. याकरिता सदर पदाची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.dbskkv.org)** प्रसिध्द करावी.

**सोबतः—वरीलप्रमाणे**

28/10/2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

Scanned by CamScanner

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)
"वाकवली विभाग"
ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र.मसंके/प्रअवा/४९५ /२०२२. दिनांक 28 OCT 2022

# जाहिर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील काजू व आंबा बागेतील झाडी–झुडूपे तोडणे,तोडलेली झाडी–झुडूपे एकत्र गोळा करणे ही कामे कंत्राटी मजुर लावून करून घेण्यात येणार आहेत. सदर कामे करून घेण्यासाठी कंत्राटी पध्दतीने एक प्रक्षेत्र सहाय्यक नेमणे या विभागाला आवश्यक आहे. काजू व आंबा बागेतील करावयाच्या कामाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १) | काजू बागेतील जंगली झाडी–झुडूपे तोडणे. |
| २) | तोडलेली झाडी–झुडूपे एकत्र गोळा करून ठेवणे. |
| ३) | आंबा बागेतील जंगली झाडी–झुडूपे तोडणे. |
| ४) | तोडलेली झाडी–झुडूपे एकत्र गोळा करून ठेवणे. |
| ५) | काजू व आंबा बागेतील साफ–सफाईचे काम करणे वरील सर्व कामे मजुरांकडून करून घेणे. |
| ६) | मजुरांच्या कामाच्या नोंदी ठेवणे तसेच मा.प्रभारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार सर्व कामे करणे व आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे. |

वरीलप्रमाणे कामे कंत्राटी पध्दतीने प्रक्षेत्र सहाय्यक नेमून माहे नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या पाच महिन्याच्या कालावधीत करावयाची आहेत. सदर कामासाठी प्रती महिना एकत्रित वेतनाचे दरपत्रक (अर्ज) नमुद करण्यात यावे. तरी काजू व आंबा बागेतील कामे करून घेण्यासाठी कृषि पदविका/कृषि पदवी प्रमाणपत्रधारक इच्छूकांनी कंत्राटी अर्ज दिनांक ११/११/२०२२ पर्यंत या कार्यालयास पोहोचतील असे पाठवावे.लखोट्यावर **वाकवली विभागातील काजू व आंबा बागेत कंत्राटी "प्रक्षेत्र सहाय्यक" पदासाठी अर्ज.** असे लिहून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (वाकवली विभाग) ता. दापोली जि. रत्नागिरी या पत्त्यावर पोष्टाद्वारे पाठवावे.

**"प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी आवश्यक अर्हता:–**

- उमेदवार हा कृषि पद्विका/कृषि पदवीधर या शाखेतील पदवीधर असावा.
- **MS-CIT** संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- कृषि पद्विका/कृषि पदवीधारक उमेदवाराचे उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठीय प्रक्षेत्रावरील "प्रक्षेत्र सहाय्यक" कामकाजाचा अनुभव असावा.

ठिकाण :–वाकवली.
दिनांक :– 28 OCT 2022

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,**
**ता.दापोली,जि.रत्नागिरी.**

Scanned by CamScanner

प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....
१. ग्रामपंचायत कार्यालय, वाकवली, पांगारी, टेटवली,कुंभवे, सुखदर
२. सुचना फलक, संचालक, मध्यवती संशोधन केंद्र, वाकवली.
३. सुचना फलक, भा.सु.यो, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

**उपरोक्त पद भरण्यासाठी नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत**

१ उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादाही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४२ वर्षे अशी राहिल.

२ सदर कामे ही सन २०२२–२३ या कालावधी करीता राहतील. कार्यालयीन कामकाजाचे स्वरुप पाहून सदर कामे चालू ठेवण्यात येतील अथवा कोणतेही कारण न देता केव्हांही सदर ठेका समाप्त केला जाईल.

३ सदरची कंत्राटी नियुक्ती कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदरची कंत्राटी नियुक्ती रद्द करण्यात येईल.

४ संबंधित उमेदवाराला कंत्राटी नियुक्ती संपण्यापूर्वी सदर कंत्राटी नियुक्ती रद्द करावयाची असल्यास त्याने तशी १ महिना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना भरणे आवश्यक आहे. आणि अशा व्यक्तीची कंत्राटी नियुक्ती भविष्यात केली जाणार नाही.

५ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी–५४४३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या कंत्राटी नियुक्ती कालावधीनंतर विद्यापीठसेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

६ कंत्राटी नियुक्ती पध्दतीच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रुपये १००/– च्या स्टॅम्पपेपरवर लिहून देऊन सादर करावे.

७ कामाची आदायगी महिन्यातून एक वेळी करणेत येईल. त्यासाठी केलेल्या कामाचे बील सादर करावे लागेल. सदर रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८ वरील प्रमाणे काम करणेचे प्रति महादर नमूद करावे.

९ अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास बीलांची आदायगी होणार नाही व आपले नाव पुढील कामाच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.

१० वरीलप्रमाणे नमुद केलेली सर्व कामे माहे नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या (पाच महिन्याच्या) कालावधीत कार्यालयीन वेळेत करावयाचे आहेत.

११ याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांनी राखून ठेवलेले आहेत.

१२ सदरचे कंत्राटी काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्ही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे.

१३ उपरोक्त कंत्राटी पदाची मुलाखती घेवून नियुक्ती देण्यात येणार असून मुलाखतीची तारीख आपणास कळविण्यात येईल.

१४ पोष्ट टपाल वाटपामधील उशिराबाबत हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

ठिकाण :–वाकवली.
दिनांक :– 28 OCT 2022

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,**
**ता.दापोली,जि.रत्नागिरी.**

Scanned by CamScanner